नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०१/२०२५ (मंगळवार) दुपार

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रम अंतर्गत पोलीस अधिकारी अंमलदार यांचे करीता ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर आयोजीत करण्यात आले विशेष व्याख्यान.

आज दि. २१/०१/२०२५ रोजी ११.३० वा. ते १४.०० वा. पावेतो मा. मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत नागपूर ग्रामिण जिल्हा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे ताण तणाव व्यवस्थापन कार्यक्रम पोलीस ठाणे, रामटेक हद्दीत कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथील स्व. कमलाकर तोतडे सांस्कृतीक सभागृह येथे मा. श्री. हर्ष पोद्दार सा. (IPS), पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन मा. श्री. डॉ. भुषण कुमार उपाध्याय सा. (IPS), सेवा निवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे होते. त्यांनी पोलीस खात्यात असलेले ताणतणाव व त्याचा होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन केले तसेच आपल्याला आलेला तणाव हा दुसऱ्याकडे रूपांतरीत न करता तो मोकळा करायचा आहे. त्या करीता वेगवेगळे तंत्र वापरावे लागते. ते म्हणजे ध्यान, धारणा, प्राणायाम याबाबत माहीती दिली. सिम्पॅथेटीक व पॅरासिमथेटीक प्रणालीबाबत सोप्या शब्दात माहीती दिली व हात हालविणे, कान रगडणे, हंमीम व्यायाम, श्वसनाचे व्यायाम करून कशा प्रकारे तणाव व्यवस्थापन करायचे याबाबत मार्गदर्शन केले.

त्याच प्रमाणे मा. श्री. हर्ष पोद्दार सा. (IPS), पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी ही तणावाचा परिणाम आपले शरीरावर व तसेच कुटुंबावर कसा परिणाम होतो. याबाबत सांगुन त्याकरीता आपले छंद जोपासावे तसेच निसर्गाचे सानिध्यात राहुन प्राण्यांचे सहवासात जावुन तो तणाव कसा कमी करावा याबाबत मार्गदर्शन केले.

त्सेच सदर कार्यक्रमा करीता श्री. अनिल म्हस्के (IPS), सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग सावनेर, श्री. रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक तसेच कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक चे कुलसचिव श्री. डॉ. देवानंद शुक्ल सर तसेच विश्व विद्यालयाचे संचालक माननीय प्राध्यापक श्री. हरेकृष्ण अगस्ती हे उपस्थित होते.











## २४ तासाच्या आत चोरीचा घरफोडीचा गुन्हा उघड, ८३,००० रूपयाचा मुददेमाल जप्त रामटेक पोलीसांची कारवाई

दिनांक २०/०१/२०२४ रोजी फिर्यादी सौ. रंजना कवडुजी ढोरे, वय ५० वर्ष रा. महात्मा फुले वार्ड रामटेक यांनी तक्रार दिली की त्यांच्या घराचा मागचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेवुन घरामधुन लोखंडी आलामरीतुन अज्ञात आरोपी याने १) प्रत्येकी ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले दोन जोड किमंती १२,००० रू. २) प्रत्येकी पाउने तेरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे २ गोप मिंती ५१,००० ३) प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या बदामी सोन्याच्या दोन अंगठया किमंती २०,००० रू. असा एकुन ८३,००० रूपयाचे दागीने कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेल्याने पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३०५(अ)भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला.

अवघ्या २४ तासात रामटेक पोलीसांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक पध्दतीने तपास करीत प्रविण भानुदास कोलते वय ४३ वर्षे रा.तालसवाडा ता.मलकापुर जि.बुलढाणा याला अटक केली तसेच आरोच्या ताब्यातुन १) प्रत्येकी ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले दोन जोड किमंती १२,००० रू. २) प्रत्येकी पाउने तेरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे २ गोप मिंती ५१,००० ३) प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या बदामी सोन्याच्या दोन अंगठया किमंती २०,००० रू. असा एकुन ८३,००० रूपयाचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**